**अतारांकित प्रश्नोत्तरांची ४४ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### राज्यात विशेषत: सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राघोजी भांगरे गुणगौरव योजनेंतर्गत लाभ देण्याबाबत

**(१) १३०१७ (२१-०७-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जमाती प्रर्वातील इयत्ता दहावी-बारावीच्या परिक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून "राघोजी भांगरे गुणगौरव योजना" राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त योजनेंतर्गत राज्यातील विशेषत: सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०९-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सदर योजना शासनाच्या दिनांक २० मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

(२) आदिवासी विकास विभागातंर्गत शासकीय, अनुदानित, नामांकित, सैनिकी व एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल मधील इयत्ता १० वी व १२ वीच्या परिक्षामध्ये राज्यस्तर, विभागस्तर, प्रकल्पस्तर व शाळास्तरावर गुणानुक्रमे प्रथम १ ते ३ /५ येणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी व विद्यार्थींना रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात येते.

(३) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात सोलापूर प्रकल्प कार्यालयातंर्गत सोलापूर जिल्यातील ३ विद्यार्थीनींना या योजनेंचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कडेगाव (जि. सांगली) येथील तहसील कार्यालयातील विविध पदे रिक्त असल्याबाबत

**(२) १३१६३ (२०-०७-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव (जि. सांगली) येथील तहसील कार्यालयात ४ शिपाई, १० तलाठी, ७ महसूल सहाय्यक ही पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागा रिक्त असल्यामुळे त्याचा कार्यालयीन कामकाजावर ताण पडत असून सेवा देताना

विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांकडून कार्यालयातील कामकाज विहित मुदतीत पार पाडले जात असून, नागरीकांना सर्व सेवा वेळेत देण्यात येत आहेत.
(३) कडेगाव (जि.सांगली) येथील तहसील कार्यालयात सद्य:स्थितीत ०१ मंडळ अधिकारी, ०१ महसुल सहायक, ०५ ग्राम महसूल अधिकारी, ०१ वाहनचालक व ०२ शिपाई अशी पदे रिक्त आहेत.
मंडळ अधिकारी संवर्गातील ०१ रिक्त पद, ग्राम महसूल अधिकारी संवर्गातून पदोन्नतीने भरणेबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.
महसुल सहायक संवर्गातील ०१ रिक्त पद, अनुकंपा अथवा नियतकालीक बदलीमधून भरणेबाबतची दक्षता घेण्यात येत आहे.

ग्राम महसूल अधिकारी संवर्गातील ०६ पदे रिक्त असून, ०१ पदावरती ग्राम महसूल अधिकारी पदभरती प्रक्रियेतील उमेदवारास नियुक्ती देण्यात आलेली आहे. उर्वरित रिक्त ०५ पदांपैकी एका पदावर, ग्राम महसूल अधिकारी पदभरती प्रक्रियेतील उमेदवाराच्या कागदपत्र पडताळणी नंतर नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरू आहे. उर्वरित रिक्त सजांचा कार्यभार कार्यरत अन्य ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे देण्यात आला असून, विहित मुदतीत कामकाज पार पाडले जात आहे.

महसुल सहायक संवर्गातील ०१ रिक्त पद अनुकंपा अथवा नियतकालीक बदलीमधून भरण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

वाहनचालक व शिपाई पदभरतीस निर्बंध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात चार कृषी विद्यापीठ असूनही बटाटा बियाणे व तत्सम बियाणांची निर्मिती होत नसल्याबाबत

**(३) १३१७५ (०८-०९-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात चारही कृषी विद्यापीठात बटाटा बियाणे निर्मिती होत नसल्यामुळे इतर राज्यातून बियाणे आणल्याने उत्पादन खर्च वाढतो अशा तक्रारी प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी परिसंवादावेळी शेतकऱ्यांनी केल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर ठिकाणी शितगृहाची सुविधा उपलब्ध नसून बटाटा हे पिक विमा योजनेत समाविष्ट नसल्याने, एकरी चौदा टन बटाटा उत्पादन देणारे नफ्याचे पिक असून असुविधेमुळे शेतकरी पीक घेवू शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कृषी विद्यापीठात बटाटा वाण निर्मिती संशोधन, बियाणे निर्मिती, शीतगृह सुविधा यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-०३-२०२६) :** (१) व (२) होय.
(३) राज्यातील हवामान हे बटाटा पीकाच्या संकरणासाठी उपयुक्त नसल्या कारणाने राज्यस्तरावर बटाटा नवीन वाण निर्मिती करण्यास मर्यादा आहेत.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथे अखिल भारतीय समन्वित बटाटा संशोधन प्रकल्प कार्यरत आहे. या संशोधन केंद्रामार्फत राज्यात बटाटा पीकाच्या उत्तम वाणांची लागवडीसाठी शिफारस केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील राजापूर येथील तलाठी कार्यालयाच्या इमारतीच्या उद्घाटनाबाबत**

**(४) १३२४४ (२१-०७-२०२५). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील राजापूर येथील तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम होऊनही उद्घाटनाअभावी कार्यान्वित झाले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयाचे बांधकाम होऊनसुध्दा कार्यालय सुरु न होण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१२-२०२५) :** (१) होय,

तथापि, येवला तालुक्यातील मौजे राजापूर तलाठी कार्यालयाची इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महसूल विभागास दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजी हस्तांतरीत करण्यात आली असून तलाठी राजापूर यांनी त्यांचे कार्यालय सदर इमारतीमध्ये दिनांक २१ ऑगस्ट,२०२५ पासून कार्यान्वित करण्यात आलेले आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) येथे आदिवासी उपयोजनेंतर्गत कामांना मंजुरी देऊन सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५) १३२६० (२१-०७-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) येथे आदिवासी क्षेत्रातील नागरिकांना दळणवळणाच्या सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत कामांना मंजूरी देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी क्षेत्रातील नागरिकांना दळणवळणाच्या सोयी सविधा तातडीने उपलब्ध होणे आवश्यक असल्याने तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी उपयोजनेंतर्गत कामांना मंजूरी देऊन सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रस्ते व पुलांच्या बांधकामाकरिता लेखाशिर्ष ५०५४ ५११७ आणि रस्ते व पुलांच्या दुरुस्तीच्या बांधकामासाठी लेखाशिर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत सद्य:स्थित असलेले प्रलंबित दायित्व विचारात घेता नव्याने कामे न घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोकर (जि. नांदेड) तालुक्यातील अनुसुचित जाती व नवबौध्द मुलांची निवासी शाळा पुन्हा सुरु करण्याबाबत**

**(६) १३२६८ (२१-०७-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि. नांदेड) तालुक्यातील अनुसुचित जाती व नवबौध्द मुलांची निवासी शाळा शासनाच्या दिनांक ४ जून, २००७ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा रद्द झाल्यामुळे भोकर येथील अनुसुचित जाती व नवबौध्द मुलांचे नुकसान होत असल्याने सदरची शाळा पुन्हा मंजूर करावी अशी विंनती स्थानिक लोकप्रतिनिधीनीं दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवासी शाळा पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सद्य:स्थितीत नांदेड जिल्हयामध्ये २ मुलांच्या व २ मुलींच्या अशा एकूण ४ शासकीय निवासी शाळा सुरु आहेत. त्यामुळे त्या जिल्हयातील विद्यार्थ्यांची सोय होत आहे. त्यामुळे भोकर येथील निवासी शाळा सुरु करण्याबाबत भविष्यात विचार करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कृषी उपसंचालक दक्षता पथक यांचे बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबत**

**(७) १३३१७ (०८-०९-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी उपसंचालक दक्षता पथक श्री.किरण शामराव जाधव यांनी कृषी खात्याच्या गुननियंत्रण विभागात कृषी अधिकारी व तंत्र अधिकारी या दोन्ही पदावर १५ वर्षे ४ महिने काम केले तसेच गुणनियंत्रण विभागात गैरव्यवहार मार्गाने कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता स्वत:च्या व नातेवाईकांच्या नावाने दहिवडी गावात अनेक नातवाईकांच्या नावे विकत घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सातारा शहरात कृषी उपसंचालक दक्षता पथक श्री.जाधव यांच्या नातेवाईकांच्या नावाने अनेक प्लॉट आहेत तसेच त्यांनी कंपन्या व एजंट यांच्या नावाने कंपन्या व व्यवहारात गैरव्यवहार मार्गाने मिळविलेला पैसा गुंतविला आहे अशा आशयाच्या तक्रारी शासनाकडे व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी उपसंचालक दक्षता पथक हे राज्याबाहेर व राज्यातील खत उत्पादक कंपन्यांना उत्पादन,

विक्री व कोमार्केटिंगचे परवाना देणारे मुख्य अधिकारी होते तसेच गुणनियंत्रण विभागातील खताच्या संबंधित सर्व कंपन्यांचे परवाने नुतनीकरण जी १ ते जी २ चे परवाने देण्याचे काम होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कंपन्याकडून वर उल्लेख केलेली कामे करून देण्यासाठी कमीत कमी लाखो रुपयांचा दर होता तसेच कृषी आयुक्तालयातील मुख्य अधिकारी कलेक्शन एजंट जे कंपन्यांकडून पैसे गोळा करत होते त्यांनी तत्कालीन कृषी मंत्री यांची मर्जी सांभाळण्यासाठी सिल्लोड महोत्सव व परळीकरीता कोट्यवधी रुपये निरनिराळ्या कंपन्यांकडून गोळा केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कृषी उपसंचालक दक्षता पथक यांनी स्वतःची पदोन्नतीने पद:स्थापना करुन लाखो रुपये देऊन केली होती तसेच ते तंत्र अधिकारी गुणनियंत्रण विभागात आयुक्तालयात बदली पात्र असतानाही त्या पदावर मुदतवाढ मिळण्यासाठी तत्कालीन कृषी मंत्री कार्यालयात लाखो रुपये दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, कृषी उपसंचालक दक्षता पथक यांनी बनावट कंपन्याना परवाना दिल्याने महाराष्ट्रात शेतकऱ्यांचा पिक उत्पादन खर्च वाढून त्यांच्या आत्महत्या प्रमाण वाढल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, कृषी उपसंचालक दक्षता पथक यांनी केलेल्या या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्यास तयार नव्हते तसेच त्यांनी मुदतवाढीसाठी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या खोटे स्वाक्षरीचे पत्र घेऊन तत्कालीन उपसचिव आस्थापना यांची व कृषि मंत्री यांच्यात मतभेद घडवून आणण्याचे प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, श्री. किरण शामराव जाधव बेहिशोबी मालमत्तेची चौकशी व त्यांच्या हितसंबंधातील कंपन्यांची चौकशी अंमलबजावणी संचालनालयामार्फत मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा (PMLA ACT) नुसार वा त्यांच्या गुणनियंत्रण विभागात केलेल्या कारभाराची चौकशी विशेष तपास पथकामार्फत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-०४-२०२६) :** (१), (२) व (३) या संदर्भात शासनास तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(४) परवाने नुतनीकरण संदर्भात प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने चौकशी सुरू आहे. इतर बाबी संदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) श्री. किरण जाधव, तत्कालीन तंत्र अधिकारी, कृषि आयुक्तालय, पुणे यांची दिनांक १३ मार्च, २०२४ रोजीच्या आदेशान्वये, कृषि उपसंचालक, दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे. परंतु, श्री.जाधव, यांनी कृषि उपसंचालक, दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्याबाबत तसेच त्यांनी तंत्र अधिकारी (गु. नि. ७ /८), कृषी आयुक्तालय, पुणे या पदावर मुदतवाढ मिळणेसाठी लाखो रुपये दिल्याची माहिती उपलब्ध नाही.

(६) हे खरे नाही.

(७) श्री. किरण जाधव हे तंत्र अधिकारी, (गु.नि. ७/८), कृषि आयुक्तालय, पुणे या पदावर कार्यरत असताना त्यांची सदर पदावरुन बदली न करण्याबाबत, श्री. विकास (आण्णा) दिनकर शिंदे, वाई विधानसभा प्रमुख, शिवसेना पक्ष यांनी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले होते. सदर निवेदनावर मा. मुख्यमंत्री यांनी "विशेष बाब करावे" असे निर्देश दिले आहेत. मा. मुख्यमंत्री यांचे निर्देश असलेल्या सदर पत्राची छायांकित प्रत विभागास प्राप्त झाली आहे. सदर पत्रावर मा. मुख्यमंत्री कार्यालयाचा जावक क्रमांक तसेच शिक्का दिसून येत नाही.

(८) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, चौकशीमधील निष्कर्षाच्या अनुषंगाने श्री. किरण शामराव जाधव, तत्का. कृषी उपसंचालक, दक्षता पथक, कृषी आयुक्तालय, पुणे यांच्याविरूध्द कृषी आयुक्तालयाचे ज्ञापन दिनांक १८ जुलै, २०२५ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

तसेच भ्रष्टाचारविषयक तक्रारीबाबत तसेच कृषी विभागातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी बेकायदेशिरपणे

सुरु केलेले कृषि निविष्ठा उत्पादक कंपन्या व विक्री केंद्रे यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सखोल तपासणी करून त्याबाबतचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागास (A.C.B) गृह विभागाने दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

कृषी विभागातील विविध योजनांमधील गैरव्यवहार आणि शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी बेकायदेशीरपणे सुरु केलेल्या कृषी निविष्ठा व उत्पादक कंपन्या आणि विक्री केंद्रे यांच्या चौकशीसाठी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आणि कृषी विभागाच्या विविध योजनांमधील गैरव्यवहारासंबंधी प्राप्त गंभीर स्वरुपाच्या इतर तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशीसाठी दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५ च्या शासन आदेशान्वये श्री. निरंजन कुमार सुधांशु, भाप्रसे, महासंचालक यशदा, पुणे यांची विशेष चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्री. निरंजन कुमार सुधांशु, भाप्रसे, महासंचालक यशदा, पुणे यांनी चौकशी करुन चौकशी अहवाल दिनांक २० जानेवारी, २०२६ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

---

## पुणे जिल्ह्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन झाल्याबाबत

**(८) १३३२० (१९-०८-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA), पुणे महानगरपालिका (PMC) आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) यांच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून बिगरशेती तसेच नगर विकास रचना विभागाकडून आराखडा मंजूर न करता १,२,३, गुंठा प्लॉट कुलमुखत्यार व विकसन करारनामा द्वारे हजारो हेक्टर जमिनीची विक्री सुरु आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, नियमबाह्य पद्धतीने जमिनीची विक्री करून आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या लोकांची फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गुंठा खरेदीचे नियम असल्याने त्या जमिनीला बागायत दाखवून गोर गरीब जनतेस कुलमुखत्यार व विकसन करारनामाद्वारे मालकी दिली जाते व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात फसवणूक होते, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, नियमबाह्य पद्धतीने छोटे प्लॉट विकण्यासाठी व मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्याच्या हेतूने महसूल विभाग व नोंदणी विभागामधील अधिकारी यांच्या संगनमताने होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महसूल विभाग अल्प, अत्यल्प उत्पन्न गटातील लोकांना विना मोबदला त्यांच्या नावे ७/१२ करून देणार आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात नगरपालिका, महानगरपालिका व गावठाण क्षेत्रातातील खरेदी विक्री काही विशिष्ट गुंठामंत्र्याच्या द्वारे चालू आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) सह जिल्हा निबंधक वर्ग १ व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर, पुणे यांच्या अहवालानुसार कुलमुखत्यार व विकसन करारनाम्याद्वारे हजारो हेक्टर जमिनीची विक्री सुरु आहे हे खरे नाही. मात्र, १, २, ३ गुंठा क्षेत्राची कुलमुखत्यारपत्रे व विकसन करारनामे यांची काही प्रमाणात नोंदणी होत आहे.

प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा तुकडा पाडून खरेदी विक्री करण्यावर प्रतिबंध आहे. मात्र अशा क्षेत्राचे

कुलमुखत्यारपत्र किंवा विकसन करारनामा नोंदणी करण्यावर प्रतिबंध नाही.

कुलमुखत्यारपत्र किंवा विकसन करारनामा याद्वारे जमिनीची मालकी हस्तांतरीत होत नाही. कुलमुखत्यारपत्राद्वारे मिळकतीशी संबंधीत वेगवेगळी कामे करण्याचे अधिकार दिले जातात. तर विकसन कराराद्वारे मिळकत विकसीत करण्याचे अधिकार दिले जातात. कुलमुखत्यारपत्र व विकसन करार या दस्तांच्या नोंदणीसाठी मिळकत किंवा जमीन बागायती असण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे जमिनीला बागायत दाखवून गोर गरीब जनतेस कुलमुखत्यार व विकसन करारनामा द्वारे मालकी दिली जाते व त्यामध्ये मोठया प्रमाणात फसवणूक हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) हे खरे नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांना योजनांचा लाभ तसेच जॉब कार्ड उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) १३३७० (०८-०९-२०२५). श्री.राजेश वानखडे (तिवसा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात संपूर्ण तालुक्याचे ठिकाण असलेल्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रुपांतर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील तिवसा हे नगरपंचायत झाल्यावर सुध्दा येथील मोठ्या संख्येने शेतकरी असून त्यांची पूर्णत: अर्थव्यवस्था शेतीवरच आधारित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर ठिकाणी जॉब कार्ड तयार होत नसल्यामुळे शासनाच्या रोजगार हमी योजना कृषी विभागाच्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजना (उदा. सिंचन विहिरी, शेततळे व पांदण रस्ते) या योजनांचा लाभ देता येणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ मिळण्याकरिता तसेच जॉब कार्ड उपलब्ध करुन देण्याबाबत कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (१०-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

तिवसा नगरपंचायतीमध्ये काही नागरीकांचा शेती हा व्यवसाय आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७च्या कलम १२ ड नुसार राज्यातील ‘क’ वर्ग नगरपरिषद/नगरपंचायती मध्ये रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. त्यानुसार नियोजन (रोहयो) विभागाचा शासन निर्णय दिनांक ३ मार्च, २०१४ अन्वये राज्यातील ‘क’ वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत या नागरी भागात रोजगार हमी योजना लागू करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. तथापी, रोजगार हमी योजना ही मागणीप्रवण योजना असल्याने कामाची मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधीत कुटुंबांची नोंदणी करून त्यांना जॉब कार्ड उपलब्ध करून देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूमी अभिलेख विभागांतर्गत संगणकीकरणातील त्रुटी आणि दुरुस्तीबाबत

**(१०) १३४८६ (१९-०८-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूमी अभिलेख विभागांतर्गत सर्व गावांचे मिळकत पत्रिका संगणकीकरण झाले असून या संगणकीकरणाच्या प्रक्रियेदरम्यान अनेक त्रुटी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रावेर व यावल (जि.जळगाव) तालुक्यात अशा त्रुटी आढळून आल्या आहेत व अशा त्रुटींच्या दुरुस्तीसाठी विभागाकडे आत्तापर्यत किती प्रकरणांची मागणी प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त झालेल्या प्रकरणांची दुरुस्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १२ मे, २०२२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ चे लेखन प्रमाद दुरूस्तीचे अधिकार उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांना प्रत्यार्पित केले आहेत. उप अधीक्षक भूमि अभिलेख, रावेर या कार्यालयात ९५१ प्रकरणांमध्ये संगणकीकरणाच्या त्रुटी दुरुस्त करण्याबाबत मागणी प्राप्त झाली असून त्यापैकी ९१२ प्रकरणांमध्ये नियमाप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच ३९ प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख, यावल कार्यालयात ९७८ प्रकरणांमध्ये संगणकीकरणाच्या त्रुटी दुरुस्त करण्याबाबत मागणी प्राप्त झाली असून ९५४ प्रकरणांमध्ये नियमाप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच एकूण २४ प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे नविन प्रशासकीय पंचायत समिती इमारत बांधकाम करणेबाबत

**(११) १३५३५ (३०-०७-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथे नविन प्रशासकीय पंचायत समिती इमारत बांधकाम करणेसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी वा सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा. लोकप्रतिनिधी याचे निवेदनास अनुसरून जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालयासाठी योग्य जागेचा शोध घेण्यासाठी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने निवड केलेल्या जागेचा अहवाल पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरीता गट विकास अधिकारी, पंचायत समिती त्र्यंबकेश्वर यांना पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे.

---

## मिरारोड (जि.ठाणे) येथे शासनाच्या ५०० एकर खार जमिनीवर मे मिरा रिअल इस्टेट डेव्हलपर्स यांनी कब्जा केल्याबाबत

**(१२) १३७४२ (१९-०८-२०२५). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मिरारोड रेल्वे स्टेशनच्या पश्चिम दिशेला असलेल्या शासनाच्या ५०० एकर खार जमिनीवर मे.मिरा रिअल इस्टेट डेव्हलपर्स यांनी कब्जा (बळकावुन) करुन मीठ उत्पादनाकरिता दिनांक १ ऑक्टोबर, १९७८ ते ३१ ऑक्टोबर, १९८३ पर्यंत परवाना क्र.४८ अन्वये परवानगी घेतली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याविरुद्ध मीठ विभागाने हरकत घेतली असता कंपनीने मीठ विभागाविरुद्ध मा.उच्च न्यायालय यांच्याकडे अपील दाखल केले असता त्यांच्या बाजूने निकाल लागला असून या निकालाविरुद्ध मीठ विभागातर्फे मा.सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असता सदरचे प्रकरण जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दाखल करण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्देशानुसार जिल्हाधिकारी यांनी उक्त कंपनीविरुद्ध निकाल देऊन सदर जमीन शासनाच्या नावे करण्यात आली असून याविरुद्ध अपर आयुक्त, कोकण यांच्याकडे दावा दाखल केला असता ती जमीन शासनाची असताना देखील कोणतीही चौकशी न करता सदर कंपनीच्या नावे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत कंपनीकडून अभिलेखात नाव लावणे कामी प्रयत्न करण्यात आले व यावर पुन्हा मीठ उपायुक्त यांच्यातर्फे हरकत घेण्यात आली असून ही जमीन शासनाची असताना कोणत्याही दाव्यात शासनाची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न न करता यामध्ये शासनाच्या काही अधिकाऱ्यांनी न्यायव्यवस्थेची दिशाभुल करून आपल्या अधिकाराचा गैरवापर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधीत कंपनी व शासकीय अधिका-यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-१२-२०२५) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे भाईंदर येथील फेरफार क्र. १२६१, दिनांक १२ जून, १९५८ नुसार मीरा सॉल्ट वर्कचे प्रोप्रायटर दिनशा कोतवाल व एम.एस कोतवाल यांच्या अर्जावरुन व कलेक्टर ऑफ सेंन्ट्रल एक्साइज यांचे कडील दिनांक ०२ मार्च, १९४४ रोजीच्या पत्रान्वये सदर जमीन सन १९४४ पासून मिठागारांसाठी उपयोगात येत असल्याकारणाने सॉल्ट डिपार्टमेंट (गव्हर्मेंट ऑफ इंडिया) यांचे नावे दाखल करण्यात आले. तद्नंतर दिनांक ०१ ऑक्टोबर, १९७८ ते दिनांक ३१ जानेवारी, १९८३ पर्यंत मीठ उत्पादनासाठी मिरा सॉल्ट वर्क्स यांना २०७.३१ एकर जमिनीकरिता परवाना दिल्याचे दिसून येते.

सदर परवाना नुतनीकरणासाठी कंपनीने अर्ज केला असता सॉल्ट डिपार्टमेंटने सदर जमिनीवर दावा केल्यामुळे कंपनीने दाखल केलेल्या रिट याचिका क्र. २८६१/१९८३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने मिरा सॉल्ट वर्क्स या कंपनीचा दावा मान्य केला. सदर आदेशाविरुद्ध सॉल्ट डिपार्टमेंट, भारत सरकार यांनी दाखल केलेल्या दावा क्र.सिए क्र.६७४३/१९९६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर जमिनीच्या मालकीहक्कासंदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे अपील दाखल करण्याचे आदेश दिनांक २५ मार्च, १९९६ रोजी दिले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २००२ रोजी मिरा सॉल्ट वर्क्स कंपनीचे अपील फेटाळून सदर जमीन महाराष्ट्र शासनाकडे वर्ग करण्याबाबत आदेश पारीत केले होते. सदर आदेशाविरुद्ध कंपनीकडून दाखल अपीलात अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक ०८ आक्टोबर, २०१० रोजीच्या आदेशान्वये कंपनीचा मालकी हक्क मान्य केला होता. सदर आदेशा विरोधात सॉल्ट डिपार्टमेंटने दाखल केलेला दावा क्र. ७७१/२०११ मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ यांनी फेटाळला आहे. त्यानुसार एकूण ११४

सर्व्हे नंबरच्या १०५ एकर १२ गुंठे क्षेत्राकरीता फेरफार ७६१०, ३ सर्व्हे नंबरच्या १ एकर ३३ गुंठे क्षेत्राकरीता फेरफार क्र. ७६११ व उर्वरित १०९ सर्व्हे नंबरच्या १३४ एकर १६ गुंठे क्षेत्राकरिता फेरफार क्र. ७६०४ अशा एकूण २४१.२१ एकर क्षेत्राकरिता सदरचे फेरफार अभीलिखीत करण्यात आले. पैकी फेरफार ७६०४ बाबत मीठ विभागाने मा.उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल केल्याने फेरफार क्र. ७६०४ नामंजूर करण्यात आला. तर दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२० रोजी मंजूर  करण्यात आलेले फेरफार क्र. ७६१० व ७६१ हे उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या पुनर्विलोकनाअंती नामंजूर करण्यात आले. सदर आदेशाविरुध्द कंपनीने दाखल केलेल्या रिट याचिका (स्टँप) क्र. १११६४/२१ मध्ये मा. उच्च न्यायालयाने मे.मिरा रियल इस्टेट डेव्हलपर्स यांचे नाव कब्जेदार सदरी घेण्याचे व संबंधित भुखंडाच्या बाबतीत भारत सरकारचे म्हणणे ऐकून अंतिम निर्णय होईपर्यंत आजची स्थिती कायम ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत. त्यानुसार सदर मिळकती मे.मिरा रियल इस्टेट डेव्हलपर्स यांच्या नावे दाखल आहेत.

सद्य:स्थितीत मा. दिवाणी न्यायालय, (वरिष्ठ स्तर) ठाणे यांच्या विशेष दिवाणी दावा क्र. ७७१/२०११ मधील दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजीच्या आदेशाविरुद्ध युनियन ऑफ इंडिया तर्फे मीठ उपायुक्त, मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे प्रथम अपिल क्र. १४३०/२०१९ दाखल केले असून पुढील सुनावणी दिनांक
२६ नोव्हेंबर, २०२५ रोजी आहे. सदर दाव्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने बाजू मांडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे भूमी अभिलेख कार्यालय सुरू करण्याबाबत

**(१३) १३७५२ (२१-०७-२०२५). श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील नागरिकांना भूमी अभिलेखा संबंधित कामांकरीता ठाणे शहरात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील नागरिकांना मोठा प्रवास करावा लागत असून त्यात वेळेचा आणि पैशाचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मिरा-भाईंदर येथे भूमी अभिलेख कार्यालय सुरू करण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०२५) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

ठाणे तालुक्यातील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नगर भूमापन विभागातील काम असल्यास अथवा अभिलेख प्राप्त करून घेण्यासाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे या कार्यालयाअंतर्गत असलेली सजा मिरा भाईंदर या सजेसाठी परिरक्षण भूमापक हे पद असून, परिरक्षण भूमापक हे आठवडयातील दर बुधवारी उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे या कार्यालयाअंतर्गत असलेली सजा- मिरा भाईंदर या कार्यालयात उपस्थित असतात व इतर दिवशी उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे या कार्यालयात उपस्थित असतात.

नगर भूमापन हद्दी बाहेरील क्षेत्रामधील मिळकतीबाबत नागरीकांना उप अधीक्षक भूमि अभिलेख, ठाणे कार्यालयात जावे लागते.

(२) हे अशंत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड येथील अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१४) १३७९७ (२१-०७-२०२५). श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड येथील अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृह सुरु करण्याबाबत आवश्यक जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १० मार्च, २०२५ रोजी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपर मुख्य सचिव, महसूल यांनी बीड शहरातील किल्ला मैदान येथील नगर परिषदेच्या सध्या बंद व निकाली असलेल्या डाक बंगल्याची जागा अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतीगृहासाठी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रस्तावात त्रुटी असल्याने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून सदर मुद्यांची माहिती मागविण्यात आली आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील महसूल विभागात नियतकालिक बदली प्रकियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याबाबत**

**(१५) १३८३३ (१९-०८-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात सन २०२५ मध्ये महसूल विभागातील नियतकालिक बदली प्रक्रिया पार पडली असून सदर प्रकियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व शासनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बदली प्रक्रिया रद्द करुन पुन्हा फेर समुपदेशानाद्वारे बदली प्रक्रिया राबविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ८ जून, २०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) परभणी जिल्ह्यातील महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या सन २०२५ मध्ये झालेल्या नियतकालिक बदली

प्रक्रियेत अनियमितता झाल्यामुळे सदर बदली रद्द करून पुन्हा फेर समुपदेशाने बदली प्रक्रिया राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (महसूल) महोदयांना दिनांक ०८ जून, २०२५ रोजी निवेदन दिले आहे. सदर निवेदनावर मा.मंत्री (महसूल) महोदयांनी "विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर नियमानुसार प्राधान्याने कार्यवाही करावी" असे निर्देश देऊन विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना सदरचे पत्र चिन्हांकित केले आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या दिनांक ०९ जून, २०२५ रोजीच्या आदेशान्वये परभणी जिल्ह्यास्तरीय अभिलेखांची तपासणी करून सखोल पडताळणी अहवाल सादर करण्याकरिता अपर विभागीय आयुक्त क्र.२, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय स्तरावरील समिती नेमण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करून अंतीम अहवाल विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडून शासनास सादर करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंडळ अधिकारी,सज्जा पाटोदा (म.) (ता.अंबाजोगाई) यांच्याबाबतीत नागरिक व शेतकरी यांच्या तक्रारी असल्याबाबत

**(१६) १३९१० (१९-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील तहसील कार्यालय अंबाजोगाई येथील संचिका क्र.२०२५/जमा-१/१५५/कावी-४३ श्री.दिलीप देशमुख विरुध्द बाबुराव वगैरे ही संचिका मंडळ अधिकारी पाटोदा (म.) यांना कलम १५५ चे अधिकार प्रदान करून त्यांच्याकडे चालविण्यासाठी वर्ग केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मंडळअधिकारी यांचे मुळ जन्म गांव पाटोदा (म.) हे प्रकरणातील अर्जदार हा त्यांच्या नातेसंबंधातील व निकटवर्ती असून त्यामुळे उक्त संचिका विवेचनासाठी व निर्णयासाठी तहसिलदार, अंबाजोगाई यांचेकडे वर्ग करण्याबाबतची मागणी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक ९ जून, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंडळ अधिकारी, सज्जा पाटोदा (म.) (ता.अंबाजोगाई) यांच्या बाबतीत शेतकरी नागरिकांमधून मोठ्याप्रमाणात वारंवार तक्रारी प्राप्त आहेत, त्यामुळे त्यांची केज, अंबाजोगाई व बीड तालुक्याबाहेर बदली करून उक्त संचिका तहसिलदार, अंबाजोगाई यांचेकडे वर्ग करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) श्रीमती देशमुख, मंडळ अधिकारी, सज्जा पाटोदा (म.) (ता.अंबाजोगाई) यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने त्यांची बदली अंबाजोगाई तालुक्याच्या बाहेर करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे पाठविण्यात आला आहे. तसेच श्रीमती देशमुख, मंडळ अधिकारी यांना दिनांक ०७ जुलै, २०२५ अन्वये ज्ञापन बजावण्यात आले असून विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे.

---

## राज्यातील आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींच्या होत असल्याबाबत

**(१७) १४०५० (१९-०८-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये आदिवासींच्या जमिनी या बिगर आदिवासींच्या होत असणे त्यामुळे आदिवासी व समाज भूमीहीन होणे तसेच आदिवासी हा मूळ शेतीवर उपजीविका करणारा शेतकरी मजूर असून त्याचे संपूर्ण कुटुंब हे शेतीच्या निगडीत व्यवसायावर आधारित असणे, मात्र काही व्यवसायिक कारणास्तव आदिवासी जमीन हे बिगर आदिवासी यांच्या नावाने खरेदी विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच इतर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आदिवासीच्या जमिनी बिगर आदिवासी नावाने खरेदी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जमातीच्या जमिनी परत करणे अधिनियम, १९७४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६ (अ) व ३६ (ब) अन्वये आदिवासी जमीन बिगर आदिवासीला विक्रीच्या परवानगीबाबत अटींची पूर्तता न करणे, त्यामुळे मा.राष्ट्रपतींच्या अध्यादेशाचे भंग होत असणे, आदिवासींचे कुळ असताना सुद्धा तहसिलदारांकडून सुरक्षित कुळ परस्पर रद्द करणे असे प्रकार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासींच्या जमिनी आदिवासींकडेच राहण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ३६-अ व महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम, १९७५ मधील तरतूदी विचारात घेऊन संबंधित जिल्हाधिकारी आदिवासी खातेदाराची जमीन बिगर आदिवासी खरेदीदाराकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त यांचेमार्फत शासनास सादर करतात. सदर प्राप्त प्रस्ताव गुणवत्तेवर तपासून शासन स्तरावर उचित निर्णय घेतला जातो. अशी परवानगी देताना प्रकरणी खरेखुरे अकृषिक प्रयोजन सिध्द होत असल्याबाबत आणि त्या जमिनीवर प्रस्तावित अकृषिक वापर अनुज्ञेय असल्याबाबत खात्री करण्यात येते. संबंधित जमिनीची विक्री करणारा आदिवासी व्यक्ती भूमीहिन होणार नाही याची दक्षता घेण्यात येते. तसेच आदिवासी खातेदारास असलेली आर्थिक निकड व सदर जमिनीच्या अकृषिक दराने आदिवासी खातेदार यांना योग्य मोबदला मिळत असल्याबाबतची खातरजमा केली जाते.

परंतु, असे हस्तांतरण अनाधिकाराने झाले असल्यास अशा जमिनीचे विनियोग करण्याचे अधिकार शासनास आहेत. तसेच दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्तांना, अनाधिकाराने आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासी व्यक्तींना होत असल्यास अथवा झाले असल्यास, आदिवासींच्या जमिनीचे पुन्हा आदिवासींकडे हस्तांतरण करण्यात यावे व सदर हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया जलद विहित कालमर्यादेत करण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

मात्र आदिवासींचे कुळ असताना सुद्धा तहसिलदारांकडून संरक्षित कुळ परस्पर रद्द करण्याची बाब आढळून आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील सर्वाधिक मच्छीमार हे पाकिस्तानच्या तुरुंगात असून त्यांच्या कुटुंबियांची दयनीय अवस्था झाल्याबाबत

**(१८) १४०५५ (१९-०८-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पालघर जिल्ह्यातील सर्वाधिक मच्छीमार हे पाकिस्तानच्या तुरुंगात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खलाशांच्या कुटुंबियाची आर्थिक स्थिती दयनीय झाली असून कुटुबांतील कमावता व्यक्ती तुरुंगात असल्याने त्यांचे कुटुंब आर्थिक विवंचनेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मच्छीमारांना मदत करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१०-१२-२०२५) :** (१) हे अंशत:खरे आहे. पालघर जिल्ह्यातील तलासरी व डहाणू या तालुक्यातील एकूण ३० खलाशी गुजरात राज्यातील पोरबंदर येथे उपजिवीकेसाठी गेले असताना समुद्रात मासेमारी करत असताना पाकिस्तानी हद्दीत पकडले गेले, त्यापैकी ११ खलाशांना सोडण्यात आले आहे १९ खलाशी अद्याप पाकिस्तानी कैदेत आहेत.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्यातील मच्छिमार खलाशांना पाकिस्तानच्या मेरीटाईम सिक्युरीटी एजन्सीने पकडल्यास अशा खलाशांच्या कुटुंबियांना उदरनिर्वाहासाठी रु.३००/- प्रतिदिन याप्रमाणे आर्थिक सहाय्य देणेबाबतचा शासन निर्णय घेण्यात आला आहे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये पाकिस्तानी कैदेत बंदी असलेल्या मृत पावलेल्या मच्छिमारांच्या कुंटुबियांना व पाकिस्तानच्या तुरुंगात असलेल्या मच्छिमारांच्या कुंटुबियांना आर्थिक सहाय्य देण्याकरिता आर्थिक तरतुद करण्यात आली असुन मृत खलाश्यांच्या कुटंबियांना अनुज्ञेय ठरत असलेली रक्कम त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद (जि.पालघर) येथील टोलनाक्याजवळ लाखो किमंतीच्या खैर लाकडाची तस्करी होत असल्याबाबत

**(१९) १४०९८ (१९-०८-२०२५). श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद मार्गावर (जि.पालघर) येथे घोळ टोलनाक्याजवळ अवैध खैर लाकडाची वाहतूक करणारे ट्रक पकडून रुपये आठ लाख किंमतीचे खैर लाकूड वन विभागाच्या पथकाने दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास जप्त केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध खैर लाकडाची तस्करी करणाऱ्या टोळीसह मुख्य सूत्रधारकास अटक करण्याबाबत तसेच अवैधरित्या खैर लाकडाची तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२४-११-२०२५) :** (१) मुंबई अहमदाबाद मार्गावर (जि.पालघर) दिनांक ०५ एप्रिल, २०२५ रोजी खैर प्रजातीचे लाकूड वाहतूक करणारे ट्रक जप्त करण्यात आले असून जप्त मुद्येमालाची किंमत सुमारे

रु. ८.०० लक्ष इतकी आहे.

(२) व (३) या प्रकरणी वन गुन्हा नोंदविला असून वाहनचालक श्री. सरफुद्दीन सामीन अली शेख यास अटक करण्यात आली होती. आरोपीस मा. न्यायालय, डहाणू येथे हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्यातील जप्त वाहन व मुद्देमाल सरकार जमा करण्याची कार्यवाही तसेच आरोपी वाहनचालक यांचे विरुध्द तक्रारपत्र तयार करण्यात आले आहे.

वनगुन्हे रोखण्यासाठी नियमीत रात्रगस्त ठेवण्यात येत असून, वेळोवेळी घोळ टोलनाक्यावर संशयित वाहनांची तपासणी करुनअवैध वाहतुकीस आळा घालण्यात येत आहे.

---

## नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुउद्देशीय स्मारक उभारण्याबाबत

**(२०) १४२१३ (१९-०८-२०२५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) मधील शासकीय विश्रामगृह येथील मालकीच्या दोन एकर जागेत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुउद्देशीय स्मारक उभारण्याची मागणी स्थानिक जनता यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाशिक वरून महाड येथील चवदार तळ्याच्या आंदोलनास निघाले असताना दोन दिवस जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे मुक्कामी होते, ही आठवण पुढील हजारो वर्षे जिवंत राहावी म्हणूनच स्मारकाची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील शासकीय विश्रामगृह हे सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात रुपांतर करणे याबाबत क्षेत्रीय कार्यालयामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. सदर अभिप्राय प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून सदर अहवाल प्राप्त होताच नारायणगाव (ता.जुन्नर, जि.पुणे) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बहुउद्देशीय स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## नरखेड (जि.नागपूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयाची जागा शासकीय विश्रामगृहासाठी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२१) १४२३२ (१९-०८-२०२५). श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागालगत असलेल्या भूमी अभिलेख कार्यालयाची जागा नवीन मंजूर शासकीय विश्रामगृहासाठी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (काटोल) यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) नरखेड (जि.नागपूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागालगत असलेल्या भूमी अभिलेख कार्यालयाची जागा नवीन मंजूर शासकीय विश्रामगृहासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांचे समवेत संबंधित स्थानिक स्थानिक प्राधिकरण यांचे सोबत दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत जिल्हाधिकारी,नागपूर यांनी भूमी अभिलेख व सार्वजनिक बांधकाम विभागास परवानगी मागणीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत निदेशित केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक भूमापन हद्दीतील अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन मिळकत पत्रकातून नाव कमी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(२२) १४२४५ (१९-०८-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक भूमापन हद्दीतील काही मिळकतींबाबत भ्रष्टाचार निर्मूलन समिती, नाशिक यांच्याकडे तक्रार अर्ज प्राप्त झाल्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५८ अन्वये पुनर्विलोकन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारचे पुनर्विलोकन करताना दिनांक ३ जून, २०२५ रोजी आदेश देताना नगर भूमापन अधिकारी क्रमांक एक यांनी भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांनी नमूद करून दिलेल्या नगर भूमापन क्रमांका व्यतिरिक्त इतर भूमापन क्रमांकाचे देखील पुनर्विलोकन करून आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुनर्विलोकन करताना भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांच्या तक्रारीत नसणाऱ्या भूमापन क्रमांकातील नागरिकांना कोणतीही नोटीस न काढता त्यांची नावे मालमत्ता पत्रकावरून दिनांक १० जून, २०२५ रोजी कमी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन नैसर्गिक न्यायाने बाजू मांडण्याची संधी न देता मिळकत पत्रकावरून नावे कमी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
भ्रष्टाचार निर्मुलन समिती नाशिक यांनी नमूद केलेल्या नगर भुमापन क्रमांकाव्यतिरिक्त न.भु.क्र. ६९३३ पै. या मिळकतीचेही पुनर्विलोकन करुन नगर भूमापन अधिकारी क्र. १ नाशिक यांनी दिनांक ०३ जून, २०२५ रोजी आदेश पारित केले आहेत.
(३) हे खरे नाही
(४) व (५) नगर भूमापन अधिकारी क्र. १ नाशिक यांनी दिनांक २८ मे, २०२५ रोजीचे नोटीसीने हितसंबधीत ६१ लोकांना मिळकतीतील बाजू मांडण्याची संधी देण्यात आलेली होती. तसेच याप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध दावे सुरु असून त्याबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील वसतीगृहात विद्यार्थ्यांसाठी योग्य सुविधा नसल्याबाबत

**(२३) १४२५२ (१९-०८-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या अखत्यारित १०० हून अधिक वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी सुमारे ९६ वसतिगृहे अनुदानित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे हजारो विद्यार्थी असून या वसतिगृहांना अनुदानाच्या माध्यमातून कोटयवधीचा निधी देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सोयी सुविधांची कमतरता असून काही वसतिगृहांची अतिशय दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन या वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना नियमानुसार सर्व सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही

(४) अनुदानित वसतिगृहे स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविले जात असल्याने विद्यार्थ्यांना शासन नियमानुसार सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देणे स्वयंसेवी संस्थेची जवाबदारी आहे.तथा वसतिगृहांमध्ये इमारतींच्या दुरुस्ती, स्वच्छतागृह व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, फर्निचर व इतर भौतिक सुविधांबाबत त्रुटी आढळल्यास संस्थेला सुधारणा करण्याकरिता सुचना देण्यात येतात तसेच काही त्रुट्या आढळून आल्यास त्यांच्या अंतिम मूल्यनिर्धारणामधून दंड आकारण्यात येवून दंडाची रक्कम कपात करण्यात येते

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कच्छी जातीना प्रमाणपत्र देण्याबाबत

**(२४) १४७५६ (१९-०८-२०२५). श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कच्छी समाजातील लोकांना इतर मागासवर्ग प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाकड़े पाठपुरावा केल्यानंतर इतर मागास प्रवर्ग विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागच्या परिपत्रकानुसार कच्छी जातींना प्रमाणपत्र देण्याबाबत काची, कच्छी नावाचे परिपत्रक निर्गमित केल्यानंतरही जिल्हा जात पडताळणी समितीद्वारे न देता हिंदू व मुस्लिम धार्मिक कारण देऊन प्रमाणपत्र रद्द करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ५ एप्रिल, २०२२ च्या आदेशानुसार ओबीसीना धार्मिक बंधन लागू नसतानाही जाणीवपूर्वक काही अधिकारी वर्ग उक्त समाजातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत संबंधित विभागाला आदेश देऊनही कच्छी मुस्लिम धर्मियासह यांना हे आरक्षण लागू असून ओबीसी समाजाचे धार्मिक बंधन नसल्याचे स्पष्ट आदेश निर्गमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२५-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० आणि महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), नियम २०१२ नुसार अर्जदारास जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्याच्या अनुषंगाने उक्त नियम, २०१२ मध्ये शासन अधिसूचना दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७, दिनांक ०३ जुलै, २०१८, दिनांक १८ जुलै, २०२४ व दिनांक २७ जुलै, २०२४ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

उक्त अधिनियम, २००० अन्वये जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राकरिता अर्ज सादर करतेवेळी अर्जदारास त्याचा महाराष्ट्रातील मानीव दिनांकापूर्वीचा मूळ अधिवास सिध्द करण्यासाठी अर्जदार किंवा त्याच्या वडीलांकडील रक्तनातेसंबंधातील व्यक्तीचे शालेय, महसूल किंवा इतर सार्वजनिक लेखे (Public document) सक्षम प्राधिकारी तसेच जात पडताळणी समितीस सादर करणे अनिवार्य आहे. शासन परिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिनांक ०९ जानेवारी, २०२५ नुसार इतर मागास प्रवर्गांच्या अ.क्र. ८५ वर कची/कच्ची/ कच्छी, कोइरी, कोईरी, कोयरी, कुशवाहा, काछी, व तत्सम जाती नमुद आहेत.

अर्जदार उपरोक्तप्रमाणे कागदपत्रे सादर करु शकला नाही, तर समितीच्या अतंर्गत असलेल्या दक्षता पथकामार्फत अर्जदाराच्या सध्याच्या/तत्कालीन रहिवास असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच व्यावसायीक बाबींची सखोल चौकशी करुन तसेच गावातील जेष्ठ वयस्क/ स्थानिक/ प्रतिष्ठीत गावकरी/ लोकप्रतिनिधी यांचे जबाब नोंदवून दक्षता पथक समितीस सविस्तर अहवाल सादर करते, यामध्ये अर्जदारांचे कागदपत्रे जरी उपलब्ध नसतील तरीही अर्जदारास जातीदाव्याबाबत आपली बाजू मांडण्याची संपूर्ण संधी दिली जाते. त्यानंतरही अर्जदाराच्या जातीदाव्याबाबत काही संदिग्धता असल्यास जात पडताळणी समिती अर्जदारास बोलावून अर्जदाराच्या जातीदाव्याच्या सिध्दतेसाठी अर्जदाराची Affinity Test घेतली जाते. अर्जदारास त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता नैसगिक न्यायाच्या तत्वानुसार पुरेशी संधी व अवधी दिला जातो. तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व मा.उच्च न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले आदेश विचारात घेवून अर्जदाराच्या जाती दाव्यासंदर्भात संबंधित सक्षम प्राधिकारी तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून प्रकरणपरत्वे गुणवत्तेनुसार निर्णय घेतला जातो. अर्जदारांची गैरसोय होऊ नये, याकरीता जिल्हास्तरीय पडताळणी समित्यांमार्फत वेळोवेळी त्रुटी पुर्तता शिबीर, वेबीनार, विशेष मोहिम घेऊन प्रलंबित प्रकरणांवर नियमोचित कार्यवाही केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण (जि.पुणे) येथील तहसिलदारांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना चाकण नगरपरिषद हद्दीतील गट नंबर २ बाबत दिलेल्या अहवालाबाबत

**(२५) १५४०९ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण नगरपरिषद (जि.पुणे) येथील महात्मा फुले नगर, गट क्रमांक २ मधील जमीन विद्यमान कुटुंब यांना घरांसाठी नगर परिषदेला हस्तांतरित करण्याबाबत व ७/१२ मध्ये नोंद करण्यातबाबत मागणी केली असून तहसीलदार, खेड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालातील प्रमुख निष्कर्ष आणि शिफारशी काय आहेत,

(३) असल्यास, तहसिलदार खेड यांनी सन २०२२ मध्ये सादर केलेल्या अहवालावर जिल्हाधिकाऱ्यांनी कोणती कार्यवाही केली आहे काय,
(४) असल्यास, सदर अहवालात स्थानिक नागरिकांनी उपस्थित केलेल्या मागण्या किंवा समस्यांचा समावेश आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१९-१२-२०२५) :** (१) व (२) खरे आहे, तहसिलदार, खेड यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२२ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल सादर केलेला आहे.

त्यानुसार मुख्याधिकारी नगरपरिषद, चाकण यांनी दिनांक ३० जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये जमीन गट नं. २ ही मिळकत प्रधानमंत्री आवास योजनेकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

एकत्रिकरण अधिकारी, पुणे यांचे दिनांक १० डिसेंबर, १९८५ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये मौजे चाकण, ता. खेड, जि. पुणे येथील जमीन गट नं. २ क्षेत्र १ हे. ९४.२ आर ही मिळकत पोलीस स्टेशनसाठी मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार गाव दप्तरी पोलीस स्टेशन नावाने गट नं. २ चा ७/१२ तयार आहे. तथापि, सदरची जागा मंजूर झाल्यानंतर अद्यापही सदर जागेचा उपयोग पोलीस स्टेशनकरीता करण्यात आलेला नाही. त्यामूळे दरम्यानच्या काळात बेघर व्यक्तींनी अतिक्रमण करून झोपडी वजा घरांची उभारणी केलेली आहे.
(३) जिल्हाधिकारी, पुणे यांनी २३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये जमीन मागणीच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत तहसिलदार, खेड यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार तहसिलदार, खेड यांनी दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ अन्वये सविस्तर चौकशी करून व त्रुटीची पूर्तता करून संबंधित कागदपत्रांसह अहवाल सादर करण्याबाबत मुख्याधिकारी नगरपरिषद, चाकण यांना कळविले आहे.
(४) स्थानिक बेघर व्यक्तींनी अतिक्रमण केलेल्या झोपडी-वजा घरांचे अतिक्रमण नियमित करण्याबाबत मागणी केली आहे.
(५) व (६) अतिक्रमित जमीन ७/१२ सदरी गृह विभागाच्या नावाची नोंद असल्याने गृह विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ०२ एप्रिल, २०२४ रोजीच्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्याकडे मागणी केली आहे.विषयांकित जमीन संपादन करण्याकामी गृह विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील श्री क्षेत्र कुंडेश्वर मंदिर परिसरात चराऊ जमीन आणि जंगलाचे भूमाफियांकडून संरक्षण करणेबाबत**

**(२६) १५४१६ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील पाईट येथील कुंडेश्वर मंदिराची जमिन खाजगी व्यक्तींना हस्तांतरित केल्याने कुरण जमिन धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जमिनीचा (डोंगर भाग) आजुबाजूच्या गावांच्या महसुली सीमा आहेत त्या गावांचा वावर येथे गुरचरण म्हणून आहे तसेच देवस्थानाच्या शेकडो गायी याच ठिकाणी असून याच गुरचरण जमिनीचा वापर होत असून ही जमीनीवर गोशाळा आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक समुदायाच्या आणि त्यावर अवलंबून असलेल्या हजारो गुरांच्या हितासाठी शासन चराईच्या जमिनीचे संरक्षण आणि संवर्धन सुनिश्चित करण्यासाठी त्यांना "गुरचरण" (चराईची जमीन/गायरान)

म्हणून घोषित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, व्यक्तिगत मालकीची जमीन धारणा क्षेत्र मोठे असून देखील यावर ज्या परिस्थितीत सिलिंग कायद्याच्या तरतुदी लागू झाल्या नाहीत त्या परिस्थितीची शासन चौकशी करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर जमिन सिलिंग कायद्यातून वा अन्य कायदे व नियमान्वये शासनाच्या ताब्यात घेऊन पश्चिम घाट पट्ट्यातील मोठे अतिसंवेदनशील क्षेत्र म्हणून याठिकाणी गुरचरण आणि सामाजिक वनीकरण यांच्याकडून वृक्षरोपण करण्यात येईल हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त जमिनीचे पुढील हस्तांतरण रोखण्यासाठी तसेच चराई आणि जंगलाच्या संरक्षणाबाबत स्थानिक समुदायाच्या तक्रारी आणि सूचना स्वीकारण्यासाठी जनसुनावणी घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१) खेड तालुक्यातील मोजे कोहिंडे बु. या गावाचे हद्दीमधील जमीन ग.नं.८०९ या मिळकतीमध्ये श्री क्षेत्र कुंडेश्वर मंदिर स्थित असून सदर मिळकतीचे ७/१२ वरील धारण क्षेत्र ७ हे.६९ आर पो.ख.० हे. ७१ आर एकूण क्षेत्र ८ हे.४० आर, आकार १५ रु.०० पैसे एवढे आहे. सदर मिळकतीचा धारणा प्रकार भोगवटादार वर्ग-२ असून कब्जेदार सदरी देवस्थानचे नांव दाखल आहे. अधिकार अभिलेख पाहता सदर मिळकतीमधील क्षेत्राचे खाजगी व्यक्तींना हस्तांतरण झाल्याचे दिसून येत नाही.
(२), (३), (४), व (५) सदर परिसरामध्ये देवस्थानामार्फत गोशाळा उभारण्यात आलेली असून देवस्थानमार्फत गोशाळेतील पशुधनाचे संगोपन केले जात आहे. सदर जमीन ही देवस्थान इनाम वर्ग-३ असल्याने सदर मिळकतीस सिलिंग कायदे व अन्य कायदे लागू होत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-नाशिक या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाशी संबंधित भूसंपादन प्रकरणाबाबत

**(२७) १५५६२ (०७-०१-२०२६). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-नाशिक या राष्ट्रीय महामार्ग विस्तार प्रकल्पाशी संबंधित भूसंपादन प्रकरणांमध्ये, विशेषतः जिल्हाधिकारी, पुणे यांच्या प्राप्त गट क्रमांक ५९, संतोष नगर, (भूतपूर्व वाकी बुद्रुक गट नंबर ८७०) येथील भूसंपादन प्रकरणांमध्ये, भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसनात उचित भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार कायदा, २०१३ च्या कलम २४ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्याची प्रशासकीय जबाबदारी जिल्हाधिकारी, पुणे यांची आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पुणे मार्फत विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक – १७ हे पुणे जिल्हयात नियुक्त केलेल्या भूसंपादन अधिकाऱ्याच्या नियुक्त केलेल्या भूभागाशी संबंधित असून यातील जबाबदाऱ्यांचा तपशील, की ज्यामध्ये जुन्या भूसंपादन कायदयाअंतर्गत जमीन अधिग्रहण निवड कार्यवाहीची प्रक्रिया व्यपगत झाली असून त्याची मुदत निश्चित करुन गट क्रमांक ५९ मधील बाधित शेतकऱ्यांना योग्य भरपाई देण्यासाठी भूसंपादन कायदा LARR २०१३ च्या कलम २४ नुसार सुरु झालेल्या भूसंपादन प्रकरणामध्ये जमिनीचा ताबा घेतला नसेल तर ती प्रक्रिया व्यपगत (लॅप्स) होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जुना भूसंपादन कायदा, १८९४ च्या अंतर्गत नुकसान भरपाई वेळेत न मिळाल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे, विशेषतः गट क्रमांक ५९ साठी, जरी सन २०१२ मध्ये नुकसान भरपाई विशेष भूसंपादन अधिकारी क्रमांक १७ यांचेकडून दिली गेली तरी ती जुन्या भूसंपादनाची प्रक्रिया उक्त कायदयाच्या सन २०१३ च्या कलम २४ च्या तरतुदींनुसार रद्द झाली असून अशा प्रकरणांमध्ये, पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाला

भूसंपादन LARR कायदा, २०१३ च्या कलम २४ च्या तरतुर्दीचे पालन करणे बंधनकारक असून प्राप्त निवेदनानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०३-२०२६) :** (१), (२), (३), (४) व (५) होय, जिल्हाधिकारी, पुणे हे समुचित शासन आहेत. राष्ट्रीय महामार्ग क्र. ५० पुणे-नाशिक फाटा सहा पदरीकरणासाठी मौजे संतोषनगर येथील गट क्र. ८७० मधील निवाडा दिनांक २० मार्च, २०१२ रोजी पारित केलेला आहे. सदर गटाची नुकसान भरपाई संबंधित खातेदार यांना अलहिदा अदा केलेली असून ताबा घेण्यात आला आहे. भूसंपादनाची वैधानिक कार्यवाही पुर्ण झाली असल्याने भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम २४ च्या तरतूदी लागू नाहीत.

---

## रायगड जिल्ह्यातील शासकीय जमिनीवर झालेली अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(२८) १५६३३ (१५-०२-२०२६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा प्रशासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान महसूल सप्ताह सुरू केला असून या काळात विविध उपक्रम राबविताना दिनांक ६ ऑगस्ट, २०२५ रोजी जिल्ह्यातील शासकीय जमिनीवर झालेली अतिक्रमणे निष्कासित करण्याचा निर्णय घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील रस्त्याच्या बाजूला बेकायदेशीरपणे उभारलेली दुकाने व व्यावसायिक गाळे काढण्यात आले असून याद्वारे वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासकीय जागेवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २९ जुलै, २०२५ अन्वये महसूल विभागामार्फत राज्यात दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी महसूल दिन व दिनांक ०१ ते ०७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीमध्ये महसूल सप्ताह आयोजित करण्याबाबत तसेच, दिनांक ०६ ऑगस्ट, २०२५ रोजी शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व इतर कार्यक्रमाचे स्वरूप निश्चित करण्याबाबत महसूल विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांना सूचित करण्यात आले होते.
(२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यातील शासनाच्या विविध विभाग/प्राधिकरणांतर्गत येणाऱ्या रस्त्यांच्या बाजूला बेकायदेशीरपणे उभारलेली दुकाने/गाळ्यांबाबतची अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही संबंधित विभाग/प्राधिकरणामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अलिबाग (जि. रायगड) येथे मॅन्ग्रोज फाऊंडेशन अंतर्गत सुरू होणाऱ्या निसर्ग पर्यटन प्रकल्पाबाबत

**(२९) १५६३८ (१५-०२-२०२६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यास अरबी समुद्र व जैवविविधतेने संपन्न खाड्या तसेच कांदळवन ही वैशिष्ट्ये असून जिल्ह्यास समुद्र पर्यटनासह कांदळवन पर्यटनातून रोजगार निर्मितीला मोठा वाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबागमध्ये उक्त कांदळवन संरक्षण आणि उपजिविका निर्माण योजनेतून मॅन्ग्रोज सेलच्या माध्यमातून मॅन्ग्रोज फाऊंडेशन अंतर्गत निसर्ग पर्यटन बहरले जाणार असून प्रशासकीय अधिकारी व नागरिकांचे या प्रकल्पाकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामध्ये मॅन्ग्रोज बोट सफारी, मॅन्ग्रोज ट्रेल, कांदळवन रोपवाटिका भेट, जंगलातील व बेटावरील पक्षिनिरीक्षण, पारंपारिक मासेमारी व ऑगलिंग, या आकर्षक स्थळांचा तसेच राज्यात प्रथम सुरू होणाऱ्या मॅन्ग्रोज कयाकिंगचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्प सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) अलिबाग कांदळवन परिक्षेत्र अधिनस्त श्रीवर्धन तालुक्यातील काळिंजे व दिवेआगर या गावामध्ये स्थानिक नागरिकांच्या सहाय्याने कांदळवन सह व्यवस्थापन समिती मार्फत कांदळवनावर आधारीत निसर्ग पर्यटन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. कांदळवन सहव्यवस्थापन समित्यांतर्गत बचत गटातील महिलांकडून सदर कांदळवन पर्यटन प्रकल्पामध्ये मँग्रोव्ह बोट सफारी, मँग्रोव्ह ट्रेल, जंगलातील व बेटावरील पक्षी निरिक्षण इ. उपक्रम राबवून कांदळवन परिसंस्थेची माहिती पर्यटकांना देण्यात येते. यासाठी स्थानिक लोकांना विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आणि क्षमता बांधणी उपक्रम राबवून तज्ञांमार्फत विविध बाबींचे प्रशिक्षण दिले गेले आहे. यामध्ये कांदळवन प्रजातींची ओळख, निसर्ग पर्यटनाची संकल्पना व त्यामधील तत्वे, स्थानिक पदार्थांना अधिक बाजार योग्य बनवण्याचे प्रशिक्षण, तारका निरीक्षण आणि जीवरक्षण प्रशिक्षण इ. उपक्रमांचा समावेश आहे.

यात्यतिरिक्त अलिबाग तालुक्यातील मौजे पालव येथे कांदळवन क्षेत्रामध्ये मँग्रोव्ह पार्क उभारण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील शासकीय वसतिगृहांच्या क्षमतेत वाढ करण्याबाबत

**(३०) १५६४१ (३०-०१-२०२६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय मुला-मुलींची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती व्हावी तसेच समाजातील इतर घटकांप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे आणि सर्व प्रकारच्या शिक्षण व उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने वसतिगृहे चालविण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय वसतिगृहांच्या क्षमतेत वाढ झाल्याने विद्यार्थी संख्येत वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, लातूर येथे २५० विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृह सुरु करण्यासाठी शासनाने मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शासकीय वसतिगृहांच्या स्थलांतरणासाठी आणि क्षमतावाढीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) होय,
(२) होय,
(३) होय,
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ अन्वये लातूर येथे २५० विद्यार्थ्यांसाठी नवीन वसतिगृह मंजुर करण्यात आलेले आहे.

सामााजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ अन्वये विभागांतर्गत ५५ शासकीय वसतिगृहांची मान्य विद्यार्थी संख्येत वाढ करण्यात आली आहे.

राज्यातील शासकीय वसतिगृहांच्या स्थलांतरणासाठी ज्या शासकीय वसतिगृहांना स्वत:ची शासकीय इमारत नाही अशा वसतिगृहांना स्वत:ची जमीन उपलब्ध करून घेऊन, क्षमतेनुसार इमारत बांधकाम करण्यात येऊन ही शासकीय वसतिगृहे स्वत:च्या शासकीय इमारतीत स्थलांतरीत करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यतील शासकीय निवासी शाळा, वसतिगृहे व आश्रमशाळांना प्रेरणादायी महापुरुषांची नावे देण्याबाबत

**(३१) १५६४३ (३०-०१-२०२६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यतील शासकीय व अनुदानित निवासी शाळा, वसतिगृहे व आश्रमशाळांच्या नावांमधून "मागासवर्गीय" हा शब्द वगळून त्या संस्थांना थोर महापुरुष आणि महिला यांची नावे देण्याचा निर्णय दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ मध्ये शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शासकीय व अनुदानित वसतिगृहांची नावे याअंतर्गत बदलण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संस्थांना नवीन नावे देताना कोणत्या निकषांवर प्रेरणादायी व्यक्तिमत्वाची निवड केली जाणार आहे, तसेच त्याची अंमलबजावणी कोणत्या कालावधीपर्यत पुर्ण होईल,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१), (२) व (३) होय, विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांना थोर महापुरुष आणि महिला यांची नावे देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात युरियासह अन्य रासायनिक खतांचा तुटवडा व खतांचा चढ्या दराने विक्री सुरू असल्याबाबत

**(३२) १५६५० (१५-०२-२०२६). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खरीप हंगामात २.३६ लाख टन युरिया खताची आवश्यकता असताना केवळ १.४८ लाख टनच खते उपलब्ध झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यासाठी खरीप हंगामात केंद्र शासनाने २.०९ लाख टन युरिया खते मंजूर केली होती, परंतु प्रत्यक्षात केवळ १.४८ लाख टनच युरिया खते राज्याला मिळाल्याची माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खरीप हंगामात कापूस, मका, सोयाबीन व इतर पिकांसाठी योग्य वेळी खते उपलब्ध न झाल्यामुळे अनेक शेतकरी नाइलाजाने खते जास्त किंमतीने खरेदी करत असल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण वाढत असून, बनावट खत विक्री व साठेबाजांची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिल्लोड जि. (छत्रपती संभाजीनगर) तालुक्यात युरिया खताचा काळाबाजार होत असल्याबाबत तक्रारी व निवेदन संबंधित कृषी अधिकाऱ्यामार्फत शासनास प्राप्त झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) चाळीसगाव (जि. जळगाव) तालुक्यात माहे जुलै, २०२५ मध्ये युरियासह अन्य रासायनिक खतांची विक्री ९०० ते १५०० रुपयांपर्यंत चढ्या दराने सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे

(६) असल्यास, या प्रकरणी व्हायरल व्हिडिओ व काही कृषी केंद्र धारक युरिया खताच्या बदल्यात वाढीव दर आकारणी करून बिल मात्र शासन दरानुसार देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याची बाब समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, खरीप हंगामातील युरिया तुटवडा व युरियाची चढ्याने विक्री व काळाबाजार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने युरिया खताच्या काळाबाजाराच्या प्रकरणी संबंधित केंद्रधारकांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-०४-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही

राज्याने खरीप हंगाम २०२५ करिता १६.०० लाख मे. टन युरिया खताची मागणी केंद्र शासनाकडे केली होती. केंद्र शासनाने खरीप हंगाम २०२५ करिता राज्यात १५.५२ लाख मे टन युरियाचे आवंटन मंजूर केले होते. त्यापैकी १२.७४ लाख मे टन युरिया उपलब्ध झाला व राज्यात १ एप्रिल, २०२५ रोजी युरियाचा ६.१९ लाख मे टन साठा उपलब्ध होता. असा एकूण १८.९३ लाख मे टन युरियाचा साठा खरीप हंगाम २०२५ करिता उपलब्ध झालेला होता.

(३) हे खरे नाही

(४) व (५) छ. संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये खतांची विक्री चढ्या दराने झाली असल्याच्या तक्रारीनुसार ३ खत विक्रेत्यांवर व संभाजीनगर जिल्ह्यात १६ खत विक्रत्यांवर कारवाई करुन त्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. चाळीसगाव (जि.जळगाव) येथे खतांची विक्री चढ्या दराने झाली असल्याबाबत तक्रार तालुका/ जिल्हास्तरावर प्राप्त झालेली नाही.

(६) गोलटगाव, ता.छ.संभाजीनगर येथील ओम साई कृषी सेवा केंद्र या खत विक्री केंद्राकडून युरिया खताची

अधिक दराने विक्री होत असल्याचा एक व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित झाला होता. सदर प्रकरणाची दखल घेत जिल्हास्तरिय भरारी पथका मार्फत चौकशी करण्यात आली. सदर विक्री केंद्राची नोंदवही, स्टॉक रजिस्टर, विक्री पावत्या तसेच उपलब्ध साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. चौकशी अंती शासन निर्धारित दराचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या आढळून आल्यामुळे संबंधित विक्रेत्याविरुद्ध खत नियंत्रण आदेश, १९८५ कारवाई करण्यात आलेली आहे. त्यानुसार विक्री परवाना निलंबित करण्यात आलेला आहे.
(७) राज्यस्तरावर युरिया खत विक्रीमध्ये होणारा गैरव्यवहार रोखण्यासाठी दिनांक ०४ ऑगस्ट, २०२५ ते २६ सप्टेंबर, २०२५ दरम्यान क्षेत्रीयस्तरावर मोहिम स्वरुपात ePOS वर असलेल्या युरिया खताच्या साठ्याची प्रत्यक्षसाठ्याची तपासणी करण्यात आली सदर तपासणी मध्ये दोषी आढळून आलेल्या ५३४ कृषि सेवा केंद्राचे परवाने निलंबीत करण्यात आले असून ६१ किरकाळे खत विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.
(८) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले (जि. कोल्हापूर) तालुक्यातील माणगाव येथे राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संयुक्त स्मारक उभारण्याबाबत**

**(३३) १५६८० (३०-०१-२०२६). श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि. कोल्हापूर) तालुक्यातील माणगाव येथे सन १९२० साली झालेल्या ऐतिहासिक परिषद स्मरणार्थ राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संयुक्त स्मारक उभारण्यासाठी १९९ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा शासनाने माहे जून, २०२४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माणगाव स्मारकाला ‘राष्ट्रीय स्मारक’ दर्जा देण्याची घोषणा शासनाने वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ‘राष्ट्रीय स्मारक’ दर्जा देण्यासाठी संबंधित प्रस्ताव पाठवणे, केंद्र शासन/संबंधित प्राधिकरणाशी पत्रव्यवहार, आणि त्यावरील सद्य:स्थिती व प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१८ नुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती वर्षानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांचे माणगाव ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे स्मारक उभारणी व प्रवेशव्दार बांधण्यासाठी एकूण रु.२,३८,६३,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर निधीतून इमारत सुशोभीकरण, होलिओग्राफिक शो, व माणगाव मुख्य प्रवेशद्वार ही विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर स्मारकाचे बांधकाम करण्यासाठी ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दिनांक १९ जून, २०१७ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्मारक समिती गठित करण्यात आली असून स्मारक प्रकल्पाचे पुढील कामाचे नियोजन सदर समितीमार्फत करण्यात येत आहे. सदर स्मारकाचा प्रस्ताव शासनास प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून प्रस्ताव प्राप्त होताच “राष्ट्रीय स्मारक” दर्जा बाबतीत पुढील कार्यवाही पार पाडण्यात येईल.

---

## नांदणी (ता. शिरोळ) येथील महादेवी हत्तीणीला परत आणण्यासाठी केंद्र शासनाशी पाठपुरावा करण्याबाबत

**(३४) १५६८८ (३०-०१-२०२६). श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यातील नांदणी येथील स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पटाचार्य महास्वामीजी मठातील ‘महादेवी’ हत्तीण गेल्या ४० वर्षांपासून मठात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये तिचा सहभाग आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राणीप्रेमी संस्थांकडून हरकत नोंदविल्यानंतर न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित हत्तीणीला गुजरात राज्यातील वनतारा वन्यजीव पुनर्वसन केंद्रात स्थलांतरित करण्यात आले, त्यामुळे जिल्ह्यासह राज्यात मोठे जनआंदोलन करण्यात आले हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, स्थानिक धार्मिक संस्थांकडून व नागरिकांकडून मठात पुनःस्थापित करण्याची तीव्र मागणी करण्यात येत असून मठ प्रशासनाने न्यायालयाने दिलेले नियम पाळून देखरेखीची पूर्ण जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असल्याचे लेखी निवेदन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब वन्यजीव संरक्षण कायद्यान्वये केंद्र शासनाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाशी समन्वय साधून न्यायालयाचा सन्मान राखून नागरिकांच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन हत्तीणीला नांदणी मठात परत आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२४-०३-२०२६) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पटाचार्य महास्वामी नांदणी यांच्या मठात असणारी माधुरी हत्ती राधेकृष्ण मंदीर हत्ती कल्याण ट्रस्ट जामनगरी (वनतारा) यांच्याकडे हाय पॉवर कमिटी दिल्ली यांचेकडील दिनांक ०३ जून, २०२५ च्या आदेशान्वये ताब्यात देणेत आलेली होती. तद्नंतर मठ संस्थानाने माधुरी हत्तीणीच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका क्र. १६४४/२०२५ अन्वये याचिका दाखल केली होती. त्यानुसार मा. सवोच्च न्यायालयाने हाय पॉवर कमिटी दिल्ली यांना खालीलप्रमाणे निदेश दिलेले आहे.

१. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार हाय पॉवर कमिटी दिल्ली यांनी दिनांक २५ सप्टेंबर,२०२५ व २२ ऑक्टोबर, २०२५ रोजी मठ संस्थान व वनतारा यांना संयुक्त तपशिलवार प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले.

२. सदरच्या निर्णयात Approval or NOCs from statutory authorities under relevant provisions of law (including CWLW Maharashtra) अशी बाब समाविष्ट आहे.

सदर प्रकरणी हत्तीसाठी पुनर्वसन केंद्र निर्माण करणेबाबत परवानगी देणारी यंत्रणा ही केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली असून याबाबतीत केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे यथोचित मार्गाने प्रस्ताव सादर करणेबाबत स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पटाचार्य महास्वामी नांदणी, मौजे-नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांना सूचित केले आहे. तथापि, स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पटाचार्य महास्वामी नांदणी मौजे- नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर यांचेकडून अद्यापही केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडे तसा कोणताही प्रस्ताव सादर केलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## मालवण बंदराच्या समुद्रकिनारी मच्छीमारांनी मासे सुकवणे, खारवणे याकरिता उभारण्यात आलेल्या झोपडया काढून टाकण्याबाबत

**(३५) १५७११ (१५-०२-२०२६). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) बंदराच्या समुद्रकिनारी मच्छीमारांनी मासे सुकवणे व खारवणे याकरिता उभारण्यात आलेल्या झोपडया काढून टाकण्याबाबत महसूल प्रशासनाने दिनांक २३ जुलै, २०२५ रोजी वा त्या दरम्यान नोटिसा बजावल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षापासून व्यवसाय करणा-या स्थानिक मच्छीमारांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बांधकाम शासनाच्या जागेत असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी स्थानिक व्यावसायिक यांच्या अनधिकृत बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, समुद्र मच्छीमारांनी आपला व्यवसाय व उदरनिर्वाह सुरक्षित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने समुद्र मच्छीमारांचा व्यवसाय आणि उदरनिर्वाह सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अद्याप अशी अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे प्रश्न उपस्थित होत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अशी मागणी करण्यात आली असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग येथे प्राप्त झालेले नाही.

(५) मालवण स.नं. ७२४, क्षेत्र १.३६.३० हे. आर ही मिळकत सॉल्ट डिपार्टमेंटची (केंद्र शासन) असून मत्स्य विभागाकडून सदरहू मिळकतीवर मच्छिमारांना मासे सुकविण्यासाठी चौथरे बांधून देण्यात आलेले आहेत.

---

## राज्यात जेष्ठ नागरिकांसाठी वेगळा आयोग निर्माण करण्याबाबत

**(३६) १५७२६ (१५-०२-२०२६). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरिकांच्या न्याय हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी स्वतंत्र असा ज्येष्ठ नागरिक आयोग स्थापन करण्याचा निर्णय केरळ राज्याने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्थापन करण्यात आलेला हा देशातील पहिलाच आयोग ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशभर तसेच राज्यातील पाल्यांकडून होणारे दुर्लक्ष, वृध्दापकाळातील हेळसांड व बेवारस आयुष्य जगावे लागणे या व अशा ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित समस्यांचे निराकरण व्हावे या उद्देशाने, केरळ राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात देखील अशाच स्वरुपाचा आयोग स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा इ.साठी शासनाने दिनांक १४ जून, २००४ रोजी राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण, २००४ (भाग-१) जाहीर केले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीकरिता दिनांक ०९ जुलै, २०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या धोरणाद्वारे राष्ट्रीय धोरणात घालून दिलेल्या तत्वांचे पालन करून मुख्यत: पुढील घटकांवर लक्ष केद्रित करण्याचे नमूद केले आहे. अ) ज्येष्ठ नागरिकांसाठी आर्थिक नियोजन करणे. ब) ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेंणे. क) ज्येष्ठ नागरिकांना ताण तणावास तोंड देण्यासाठी सक्षम करणे.

तसेच, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ अन्वये ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक बाबतीत सक्षम करणे, छळ पिळवणूक यापासून संरक्षण, मदत निवारा इत्यादी सुविधा पुरविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समाजकल्याण विभागांतर्गत राज्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये वाढविण्यात आलेल्या जागांबाबत

**(३७) १५७४५ (१५-०२-२०२६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी राज्यभरात ४४१ सरकारी वसतिगृहे कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतिगृहांमध्ये मुले व मुली निवास करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ५५ शासकीय वसतिगृहांमध्ये १ हजार २९५ नव्या जागांची वाढ केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या वसतिगृहांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने इतर कोणते विशेष उपक्रम व योजनांची अंमलबजावणी केली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. संजय शिरसाट (०६-०३-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

सदर योजनेंतर्गत राज्यात एकूण ४४९ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यामध्ये मुलांची २३१ व मुलींची २१८ शासकीय वसतिगृहे सुरू आहेत.

(२) सदर वसतिगृहांची एकूण मान्य संख्या ४६,६७३ एवढी असुन त्यापैकी मुलांच्या वसतिगृहाची मान्य संख्या २४९५८ व मुलींच्या वसतिगृहाची मान्य संख्या २१७१५ एवढी आहे. सद्य:स्थितीत या वसतिगृहात एकुण ३३८८१ प्रवेशित विद्यार्थी संख्या आहे. त्यापैकी मुले-१८०६० व मुली-१५८२१ एवढे प्रवेशित आहेत.

(३) सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय दिनांक २५/०८/२०२५ अन्वये सामाजिक न्याय विभागांतर्गत जी वसतिगृहे शासकीय इमारतींमध्ये स्थलांतरीत झालेली आहेत व अशा स्थलांतरीत झालेल्या शासकीय इमारतींची विद्यार्थी प्रवेश क्षमता वसतिगृहांच्या मान्य संख्येपेक्षा अधिक आहे, अशा ५५ शासकीय वसतिगृहांची विद्यार्थी

मान्य संख्येत वाढ करणेत आली आहे.

या ५५ शासकीय वसतिगृहांची पूर्वीची एकूण मान्य संख्या ४१४० विद्यार्थी एवढी होती. आता ती इमारत क्षमतेएवढी वाढविण्यात येऊन ५४३५ विद्यार्थी एवढी करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे ५५ शासकीय वसतिगृहांमध्ये एकूण १२९५ विद्यार्थी संख्या वाढ करण्यात आलेली आहे.

(४) शासकीय वसतिगृहातील प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाची सोय व्हावी याकरीता राज्यशासन, तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर शासकीय वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून देते. या वसतिगृहामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन,निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक साहित्य या सुविधा मोफत पुरविण्यात येतात.

शासन निर्णय दिनांक २६/०९/२०२५ अन्वये वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता महागाई निर्देशांकानुसार वाढ करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यात कालबाह्य/बनावट कीटकनाशकांच्या विक्रीवर नियंत्रण आणण्याबाबत करावयाची उपाययोजना

**(३८) १६१०६ (१५-०२-२०२६). श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात काही विक्रेत्यांकडून कालबाह्य किंवा निकृष्ट किटकनाशकांची बेकायदेशीर विक्री होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाच्या परवानगीशिवाय, कालबाह्य मुदतीची माहिती लपवून, तसेच देयक न देता किंवा फसवणुकीच्या पद्धतीने शेतकऱ्यांना किटकनाशके विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोल्हापूर जिल्हा उस उत्पादक संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी केली असून दोषी विक्रेत्यांवर त्वरित गुन्हे दाखल करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यात बनावट व कालबाह्य किटकनाशकांच्या विक्रीवर नियंत्रण आणण्यासाठी कृषी विभाग व जिल्हा प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही

कालबाह्य व बनावट किटकनाशकांची विक्रीबाबत उस उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य, मांजरी (बु), ता. हवेली जि. पुणे यांचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ चे पत्र जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील १०३३ विक्री केंद्राची तपासणी करण्यात आली. सदर प्रकरणी कालबाह्य / बनावट किटकनाशकांची विक्री होत असल्याचे आढळून आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कालबाह्य व बनावट किटकनाशकांची विक्रीबाबत उस उत्पादक संघ, महाराष्ट्र राज्य, मांजरी (बु), ता. हवेली जि. पुणे यांचे दिनांक १३ ऑक्टोबर,२०२५ चे पत्र जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना प्राप्त झाले आहे.

(४) कोल्हापूर जिल्हात १२ गुणनियंत्रण निरीक्षकांमार्फत गुण नियंत्रणाचे कामकाज केले जाते. कोल्हापूर जिल्ह्यात गुण नियंत्रण निरीक्षकांकडून किटकनाशक विक्री केंद्र व उत्पादक कंपन्यांची तपासणी नियमितपणे करण्यात येते. कोल्हापूर जिल्हात एकूण १२३० किटकनाशक विक्री केंद्रापैकी १०३३ विक्री केंद्राची तपासणी करण्यात आली आहे. एकुण १६९ किटकनाशक नमूने प्रयोगशाळेत तपासण्यात आले आहेत. त्यापैकी ०२ नमूने अप्रमाणित आढळले आहेत. संबधित अप्रमाणित नमुन्यावर किटकनाशक कायदा १९६८ व किटकनाशक नियम १९७१

अन्वये कायदेशीर कारवाई सुरु असून उर्वरित तपासणी दरम्यान किटकनाशक कायदा १९६८ व किटकनाशक नियम १९७१ अन्वये अनियमितता आढळलेल्या १५ विक्री केंद्रांना विक्री बंद आदेश देणेत आले आहेत. कीटकनाशकाचे ०२ परवाने निलंबित केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे आक्से, (ता. बोरीवली, जि. मुंबई उपनगर) येथील विविध धार्मिक समाजांसाठी दफनभूमी व स्मशानभूमी विकसित करण्याबाबत.**

**(३९) १६१४६ (३०-०१-२०२६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आक्से, (ता. बोरीवली, जि. मुंबई उपनगर) स.नं. १५, १६ न.भु.क्र. १२ पे १२/१ तसेच मौजे मालवणी, स.नं. २१८ व २६३, न.भु.क्र. ३५५२ व ३५५४ या मिळकतींवर मुस्लिम दफनभूमी, शिया मुस्लिम दफनभूमी, ख्रिश्चन दफनभूमी व हिंदू स्मशानभूमी विकसित करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी मा. महसूल मंत्र्यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मा. महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले असूनही सदर कामकाज सुरू झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही. सन्मा. श्री.अस्लम शेख यांचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजीचे निवदनाचे अनुषंगाने मौजे- मालवणी, न.भू.क्र.३५५४ मधील शासकीय जागा स्मशानभूमीसाठी आरक्षित आहे. तथापि, शासन ज्ञापन दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ अन्वये न.भू.क्र.३५५४ मिळकतीचे क्षेत्र धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी प्रदान करणेसाठी मंजुरी देण्यात आली आहे. तसेच शासन पत्र, दिनांक २७/०६/२०२५ अन्वये न.भू.क्र.३५५४ वरील स्मशानभूमी अन्य ठिकाणी स्थलांतरीत करणेसाठी व स्मशानभूमी धारावी पुनर्विकास प्रकल्पाने स्वखर्चाने विकसीत करून स्मशानभूमी नियोजन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणेस मान्यता दिली आहे. त्यानुसार स्मशानभूमीसाठी पर्यायी जागा म्हणून न.भू.क्र.३५५६ सरकारी जागा निश्चित करणेत आली आहे. त्यानुषंगाने न.भू.क्र.३५५६ येथील शासकीय जागा स्मशानभूमीसाठी मंजूर करणेसाठी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाने दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला असून त्यानुषंगाने प्राधम्याने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**पनवेल( जि.रायगड) तालुक्यात युरिया खतांच्या कृत्रिम टंचाईबाबत**

**(४०) १६२९८ (१५-०२-२०२६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात झपाट्याने शहरीकरण होत असले तरी शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या खरीप हंगामाची कामे सुरू असून त्यामुळे खतांची मोठ्या प्रमाणात गरज असताना युरिया खतांची दुकानदारांकडून कृत्रिम टंचाई केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुकानदार काळ्या बाजारात खतांची जादा किंमतीने विक्री करत असल्याने शेतक-यांना युरिया खत मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार युरिया खतांची कृत्रिम टंचाई करणा-या दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (२०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे
(२), (३) व (४) रायगड जिल्हयासाठी खरीप २०२५ मध्ये युरिया खताचे ११९३० मे.टन आवंटनापैकी एकूण ११३९३ मे.टन युरिया मागणीनुसार नियोजनाप्रमाणे जिल्हयात तालुकानिहाय खताचे वितरण करण्यात आले आहे. खरीप २०२५ मध्ये रायगड जिल्ह्यात युरीया खताचा ६९८.६७ मे टन संरक्षित साठा (Buffer Stock) करण्यात आला होता. व जिल्ह्यात मागणीप्रमाणे सदर संरक्षित साठा तात्काळ मुक्त करण्यात येवून शेतकऱ्यांना वेळेवर युरीया खताचा पुरवठा करण्यात आला होता.

खरीप २०२५ मध्ये १२९५ मे.टन युरिया पनवेल तालुक्यासाठी वितरण झाले असून माहे ऑगस्ट मध्ये पनवेल तालुक्यासाठी २८१.२९ मे.टन युरिया विक्रेत्याकडे पुरवठा करण्यात आला आहे.

सदर युरियाचे शेतकऱ्यांना योग्य दरात व उपलब्धतेनुसार वितरण होणेच्या दृष्टीने तालुका स्तरावरील कृषि अधिकारी गुणनियंत्रण यांचेमार्फत तपासणी करण्यात येत आहे. सदर तपासणीमध्ये जादा दराने विक्री करत असलेल्या एका विकेत्याचा व्रिकी परवाना निलंबीत करण्यात आला आहे. तसेच रेकॉर्ड उपलब्ध नसणे, पॉस साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत असणे इत्यादी कारणामुळे रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ नुसार एका विक्रेत्याचा परवाना रदद करण्यात आला आहे.

रासायनिक खत उपलब्धतेबाबत व वापराबाबत प्रसिध्दी माध्यमाद्वारे जनजागृती करण्यात आली आहे रासायनिक खताबाबत शेतकऱ्यांकडून कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तसेच पनवेल तालुक्यात खताचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यात तलाठी पदाच्या १० टक्के जागा रिक्त असून त्यामुळे एका तलाठ्याला दोन ते तीन गावांचा कारभार पाहावा लागत असल्याबाबत

**(४१) १६२९९ (३०-०१-२०२६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात तलाठी पदाच्या १० टक्के जागा रिक्त असून त्यामुळे एका तलाठ्याला दोन ते तीन गावांचा कारभार पाहावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच दूरवरच्या गावांत तलाठी जात नसल्यामुळे सरकारी योजना, दाखले, अनुदान आदींसाठी नागरिकांना दलालांकडून काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तलाठी पदाच्या रिक्त जागा भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी या संवर्गातील रिक्त पदांचा कार्यभार नजीकच्या ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेला आहे व त्यांचेमार्फत नागरिकांना शासकीय सेवा पुरविणे तसेच शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे ही कामे केली जात आहेत. ग्राम महसूल अधिकाऱ्याकडील बहुतांश कामे ही ऑनलाईन प्रणालीद्वारे सुरु असल्याने नागरिकांना दलालांकडून काम करुन घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०२ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार तलाठी पदभरती २०२३ बाबत निवडसूची व प्रतिक्षासूचीचा कालावधी २ वर्षाच्या कालमर्यादेत म्हणजेच दिनांक १३ मार्च, २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. सबब तलाठी पदभरती २०२३ मधील रायगड जिल्ह्यातील १२ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरीत रिक्त पदे वित्त विभागाच्या सहमतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साई (ता. पनवेल जि.रायगड) गावातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(४२) १६३६५ (१५-०२-२०२६). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साई (ता. पनवेल जि.रायगड) गावातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या मानवी हक्काचे उल्लंघन होत असल्याचे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने केलेल्या पाहणी दौऱ्यात माहे जुलै, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, मानवी हक्क आयोगाचे न्यायमुर्ती यांनी राज्याचे मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, प्रकल्प अधिकारी, पेण यांच्यासह आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांना माहे जुलै, २०२५ मध्ये नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०९-०३-२०२६) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) मौजे साई, ता. पनवेल, जि. रायगड येथे भाड्याच्या इमारतीमध्ये शासकीय आश्रमशाळा कार्यरत होती. सदर आश्रमशाळेतील नैसर्गिक वर्गवाढीमुळे वाढलेले वर्ग व विद्यार्थीसंख्या यामुळे सदर इमारतीमध्ये भौतिक सुविधा अपुऱ्या पडत होत्या. सद्यस्थितीत सदर आश्रमशाळेचे मौजे खानवळे, ता. पनवेल, जि. रायगड येथे स्थलांतर करुन नवीन इमारत भाडेतत्वावर घेण्यात आली आहे. सदर इमारतीमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे दुसरे सत्र दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ पासून या नवीन ठिकाणी सुरु करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नारनोली ( ता. जव्हार जि. पालघर ) येथील गावात रस्त्याअभावी मृतदेह डोलीतून नेल्याबाबत

**(४३) १६४०० (१५-०२-२०२६). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नारनोली (ता. जव्हार जि. पालघर) येथील श्री.महेंद्र जाधव यांचा जव्हार रुग्णालयात उपचारादरम्यान दिनांक, १३ सप्टेंबर, २०२५ मध्ये मृत्यू झाला, त्यांचा मृतदेह त्यांच्या गावी घेऊन जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे २ किमी पर्यंत मृतदेह डोलीतून घेऊन जावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांही दिवसापूर्वी नवजात बाळासह मातेला झोळीतून १० किमी प्रवास करावा लागल्याने बाळाचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेमुळे गावकरी व सरपंचांनी संताप व्यक्त करताना रस्त्याच्या अभावी गरोदर महिला, आजारी वृद्ध व्यक्तींना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चांभारशेत नारनोली पाड्यातील ग्रामस्थांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायत, सरपंच तसेच तेथील रहिवाशांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भविष्यात असे प्रकार घडू नयेत याकरीता शासनाने जिल्ह्यातील गावे, वाडी, वस्तीपर्यंत रस्त्यांची सुविधा उपलब्ध करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (२०-०३-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) आदिवासी उपयोजना क्षेत्रात शासनाच्या विविध विभागाकडून तसेच, जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याची कार्यवाही करण्यात येत असून, दरवर्षी त्यासाठी संबंधित विभागामार्फत अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते. आदिवासी विकास विभागाकडून इतर विभागांना आवश्यकतेप्रमाणे पुरक स्वरुपाचा निधी उपलब्ध करुन देण्यात येतो व त्यासाठी प्रतिवर्षी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीच्या पात्र लाभधारकांसाठी राबविण्यात येत असलेल्या शबरी आदिवासी घरकूल योजनेबाबत

**(४४) १६६१४ (१५-०२-२०२६). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीच्या अर्जदारांना बांधीव व पक्की घरे उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक २८ मार्च, २०२३ रोजीच्या शासननिर्णयानुसार, "शबरी आदिवासी घरकुल योजना" राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ या कालावधीत राज्यातील (वाशिमसह) सुमारे २ लाख ४१ हजार घरकूलांचे उदिष्टअसतांना ६१ हजारांच्यावर घरकुले प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये

निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरकुल योजनेच्या कामात दिरंगाई होत असल्याने राज्यातील सुमारे ५४,०९६ घरकुलांच्या मंजुरीचे काम गत तीन वर्षांपासून अपूर्ण असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेची प्रगती पडताळण्यासाठी अर्थ व सांख्यिकी विभागाची मुल्यमापन समिती स्थापन करण्यात आली असून या समितीने घरकुलासाठी मिळणारे अनुदान वाढविण्यासह अन्य शिफारशी शासनास सादर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निधीची कमतरता, वाढीव बांधकाम खर्च आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे घरकुल मिळत नसल्याने आदिवासी बांधवांमध्ये नाराजीची व तीव्र संतापाची भावना आहे हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, घरकुलांअभावी आदिवासी कुटुंबांना अमानवी परिस्थितीत राहवे लागत असल्याने त्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, "शबरी आदिवासी घरकुल योजनेस' निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच योजनेच्या कामांना गती देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (१६-०३-२०२६) :** (१) दिनांक २८ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयानुसार सदरची शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्यात येत आहे.

(२) व (३) सद्य:स्थितीत १८६५०३ इतक्या घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून १०६८९९ इतकी घरकुले पूर्ण झालेली आहेत व ७९६०४ इतकी प्रगतीपथावर आहेत.तसेच उर्वरीत ३६,६२३ लाभार्थ्यांना मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) हे खरे नाही.

(७) i) शबरी आदिवासी घरकूल (ग्रामीण) योजनेंतर्गत आदिवासी विकास विभागाने सन २०२१-२२ ते २०२४-२५ पर्यंत एकूण रु.२६३१.७५ कोटी इतका निधी सदर योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेस उपलब्ध करून दिला आहे.

ii) दिनांक ०४ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयानुसार केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजने अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्श्यातून रु.५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडूप एस वॉर्ड हददीमध्ये सब - रजिस्टार कार्यालय सुरु करणेबाबत

**(४५) १६६८८ (१५-०२-२०२६). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडूप एस वॉर्ड येथे सब रजिस्टार कार्यालय नसल्याने स्थानिक नागरिकांना कामानिमित्त कोकणभवन बेलापूर येथे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात मोठया प्रमाणात पुनर्विकास सुरु असल्याने व नागरिकांना मालमत्ता नोंदणीसाठी कोकणभवन बेलापूर येथे जावे लागत असल्याने त्यांचा पैसा व वेळ वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी भांडूप एस वॉर्ड हददीमध्ये सब रजिस्टार कार्यालय झाल्यास नागरीकांची गैरसोय दुर होईल या दृष्टीने मा.सहकार मंत्री महोंदयाकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी पत्राद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) मा. सहकार मंत्री महोदयांकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजीचे पत्र प्राप्त झालेले नाही. तथापि, नोंदणी व मुद्रांक विभागाची, मालमत्ता नोंदणीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये कुर्ला तालुक्यासाठी विक्रोळी (पूर्व) येथे २, चेंबूर (पूर्व) येथे २ व नाहूर (पश्चिम) येथे १ अशी एकूण पाच (५) सह दुय्यम निबंधक कार्यालये कार्यरत आहेत.मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन्ही जिल्ह्यातील दस्त नोंदणीसाठीचे कार्यक्षेत्र दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन अधिसुचनेन्वये सामाईक करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ पासून सुरू करण्यात आली आहे.मुंबई शहर व मुंबई उपनगर या कार्यक्षेत्रातील कोणत्याही मिळकती संदर्भातील दस्ताची नोंदणी या दोन्ही जिल्हयात कार्यान्वित (Physical) असलेल्या ३२ सह दुय्यम निबंधक कार्यालयांपैकी कोणत्याही कार्यालयात करता येते.

---

**राज्यातील शेतीमधील वाहतूकींची समस्या सोडविण्यासाठी " मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेस" मान्यता देण्याबाबत**

**(४६) १६८७८ (३०-०१-२०२६). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतीमधील वाहतूकींची समस्या सोडविण्यासाठी "मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेस" दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे उक्त योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०४-२०२६) :** (१) होय हे खरे आहे,

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. लवेसू-२०२५/प्र.क्र.४५८/भूमापन दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ अन्वये शेत/पाणंद रस्ते यांचे मजबुतीकरण करण्यासंदर्भात समग्र योजना तयार करण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठका दिनांक ०६/०८/२०२५, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ व दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी पार पडल्या. समितीच्या शिफारसींना अनुसरुन मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ०७ डिसेंबर, २०२५ च्या बैठकीत सविस्तर प्रस्ताव मांडण्यात आला होता.

सदर प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यानंतर दिनांक १४ डिसेंबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामिण भागातील शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी महसूल व वन विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" सुरु करुन ती राबवण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

(२) मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजनेसाठी स्वतंत्र्य निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.०२ (ई-१४८९४९०)/पाणंद रस्ते दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ अन्वये "मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना (कार्यक्रम) (२५१५२७८२)" या स्वतंत्र्य लेखाशिर्षाला मान्यता देण्यात आली आहे. तसेच सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रु. १००० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात भूमी अभिलेख विभागात ७०० भूकरमापकांची रिक्त जागांवर नव्याने पदभरती करण्याबाबत

**(४७) १७१९२ (३०-०१-२०२६). श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भूमी अभिलेख विभागात भरती झालेल्या भूकरमापकांना अन्य विभागात उत्तम दर्जाच्या सरकारी नोकरीचा पर्याय मिळाल्याने मागीलवर्षी १२०० पदांपैकी सुमारे ७०० जणांनी नोकरीचा राजीनामा दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त जागांवर नव्याने पदभरती करण्यास शासनाने मान्यता दिली असून त्यानुसार भूमी अभिलेख विभागात ७०० भूकरमापकांची भरती केली जाणार असल्याचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पद हे अवनत करुन त्यांची वेतनश्रेणी वाढवावी तसेच या भूकरमापकांना पाच वर्षानंतर थेट उपअधिक्षकांचा दर्जा दयावा असा प्रस्ताव भूकरमापक विभागाने शासनाकडे देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०२-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

भूमि अभिलेख विभागात भरती झालेल्या भूकरमापकांना अन्य विभागात सरकारी नोकरीचा पर्याय मिळाल्याने गेल्यावर्षी १२०० पदापैकी सुमारे ७०४ जणांनी नोकरीचा राजीनामा दिला.

(२) होय हे खरे आहे.

भूमि अभिलेख विभागातील गट-क संवर्गातील सरळसेवेची माहे मे, २०२५ अखेरची रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार भूकरमापक पदाच्या एकूण ९०३ पदांसाठी दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ व दिनांक १४ नोव्हेंबर,२०२५ रोजी परिक्षा घेण्यात आली.

(३) हे अशंत: खरे आहे.

भूकरमापक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तांत्रिक अर्हता धारण करणारे कर्मचारी भूकरमापक पदावर

नियुक्त होतात. सातव्या वेतन आयोगानुसार महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास एस-६ अशी वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, इतर विभागातील भूकरमापक संवर्गास एस-८ अशी वेतनश्रेणी लागू असल्याने इतर विभागातील भूकरमापक संवर्गाप्रमाणे एस-८ अशी सुधारित वेतनश्रेणी महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास लागू करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) हे अशंत: खरे आहे.

भूकरमापक संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तांत्रिक अर्हता धारण करणारे कर्मचारी भूकरमापक पदावर नियुक्त होतात. सातव्या वेतन आयोगानुसार महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास एस-६ अशी वेतनश्रेणी लागू आहे. तथापि, इतर विभागातील भूकरमापक संवर्गास एस-८ अशी वेतनश्रेणी लागू असल्याने इतर विभागातील भूकरमापक संवर्गाप्रमाणे एस-८ अशी सुधारित वेतनश्रेणी महसूल विभागातील भूकरमापक संवर्गास लागू करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाने मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा निधी थकीत ठेवला असल्याबाबत

**(४८) १७७४२ (३०-०१-२०२६). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत गत वर्षीच्या अयोध्या यात्रेचे इंडियन रेल्वे कॅटरिंग ॲन्ड टुरिझन कार्पोरेशन (आयआरसीटीसी) चे शुल्क अद्याप दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आयआरसीटीसीने त्यांच्या पुढील यात्रा स्थगित ठेवल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सन २०२४-२५ मधील थकीत रक्कम अदा करावी व सन २०२५-२६ यावर्षीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०५-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सन २०२४-२५ ची उर्वरित रक्कम रूपये १.८६ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली असून त्यातून कर कपातीनंतर रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सन २०२५-२६ मध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धान्यात वापरणारे कीडनाशक औषधी हानिकारक असणे बाबत

**(४९) १८३७६ (३०-०१-२०२६). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांनी धान्य कीडमुक्त करण्यासाठी स्वच्छतेची काळजी घेणे आणि योग्य व मोकळया जागी धान्य साठवणे ही सोपी आणि प्रभावी पद्धत आहे. याशिवाय, कडुलिंबाची पाने, लवंग, लसूण या नैसर्गिक कीडनाशकांचा वापर केल्याने धान्य सुरक्षित राहते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी, गहू, तांदूळ, कडधान्यांना भुंगा, सोंड व इतर किडींपासून वाचवण्यासाठी नैसर्गिक कीडनाशकाऐवजी बोरिक सेल्फॉसमधील कीडनाशक गोळ्या, पावडर आणि इंजेक्शन्सचा वापर मोठ्या

प्रमाणावर करतात हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याच रसायनांमुळे तयार होणाऱ्या विषारी गॅसमुळे अहिल्यानगर जिल्ह्यात दोन लहान मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास नैसर्गिक कीडनाशकाबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (१६-०३-२०२६) :** (१), (२) व (३) होय
(४) शेतकऱ्यांनी धान्य किडमुक्त करण्यासाठी स्वच्छतेची काळजी तसेच कडुलिंबाची पाने, धान्य कोठ्यांचा वापर करण्याबाबतच्या सुचना ग्रामस्तरावर क्षेत्रीय अधिकारी याच्यामार्फत देण्यात येत असतात. धान्य साठवणुकीसाठी किडनाशकांचा वापर करण्याच्या पध्दतीबाबत जनजागृती मोहिमा क्षेत्रीय स्तरावरील कार्यक्रमातुन शेतकऱ्यांना देण्यात येत असतात. शेतकरी, कृषीसेवा केंद्र चालक, धान्य व्यापारी यांचेमध्ये सदर घरगुती वापराच्या किटकनाशकांबाबत जनजागृती करण्यात येते. धान्य साठविण्याकरीता वापरात येणारी ज्या किटकनाशकेपासून वाफ तयार होते अशी किटकनाशके ही प्रशिक्षित अशा पेस्ट कंट्रोल ऑपरेटर मार्फतच वापरण्याबत व घरगुती धान्य साठविताना रासायनीक किटकनाशके वापरण्यापेक्षा नैसर्गिक स्त्रोत असणारी जैविक किटकनाशकेच जसे की कडुलिंबाची पाने इत्यादीचा वापर करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यामध्ये धान्य साठवणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या किटकनाशकांमुळे तयार होणाऱ्या विषारी गॅसमुळे विषबाधेच्या घटना होउ नये यासाठी जिल्हास्तरावर जनजागृतीकरीता किडनाशक कंपनीची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करुन त्यांचेमार्फत जनजागृती करणे, सुरक्षा किट वापरणे विषबाधे संदर्भातील करावयाचे उपचार व त्याचे ॲन्टीडोट याची माहिती शेतकऱ्यांना देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साखरखेर्डा (जि.बुलढाणा) ग्रामपंचायतीची तालुका म्हणून निर्मिती करण्याबाबत

**(५०) १८६१२ (३०-०१-२०२६). श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे साखरखेर्डा (जि. बुलढाणा) या गावाच्या तालुका निर्मितीसाठी दिलेल्या उत्तरानुसार नवीन तालुका निर्मिती ही एक आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असल्याने याबाबत विविध बाबी तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०२-२०२६) :** (१) व (२) नाही. नागरी क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, जिल्हा/तालुक्यातील दूरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सद्य:स्थितीत तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार राज्यात अपर तहसिल कार्यालय निर्मितीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) सद्य:स्थितीत दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये सर्व विभागीय आयुक्तांकडून आवश्यक कार्यालय निर्मितीचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांची अभ्यासपूर्ण तपासणी करुन पुढील आवश्यक कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.